पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटारोड, सिव्हील लाईन, वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४
e-mail :sp.washim@mahapolice.gov.in Website:www.washimpolice.gov.in

## प्रेस नोट

दिनांक :– ०६/०३/२०२४

### गावठी दारुअड्डयावर स्थानिक गुन्हे शाखेची धाड ५,०९,५००/– मुद्देमाल ( मोह सडवा नष्ट )

मा. पोलीस अधिक्षक श्री.अनुज तारे यांनी वाशिम जिल्हयातील सर्व प्रकारचे अवैध धंदे करणाऱ्या इसमांवर प्रभावी कारवाई करण्याचे त्यामध्ये विशेषत: अवैध हातभट्टी दारु,गाळप, वाहतुक, विक्री करणाऱ्याविरुध्द प्रभावी रेड करुन अवैध दारुचे व्यवसाय नष्ट करण्याचे व दारुबंदी मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे आदेश दिले होते. त्याच अनुषंगाने अवैध हातभट्टी दारुवाल्यांविरुध्द प्रभावी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे दृष्टीने वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्याकरीता जिल्हयातील सर्व ठाणेदारांना आदेशित केले आहे.

त्याच पार्श्वभुमीवर स्थानिक गुन्हे शाखेने विशेष मोहिमे दरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे दिनांक १४/०६/२०२४ रोजी पोलीस स्टेशन अनसिंग हद्दीतील ग्राम मोहगव्हाण येथे गावठी हातभट्टी दारु गाळप व विक्री करणाऱ्यांवर अचानक धाड टाकुन कारवाई केली असता १) १०० लिटरच्या १० लोखंडी टाक्यामध्ये मोहसडवा माच एकुण १००० लिटर प्रत्येकी १००/–रु दराने एकुण किं.१,००,०००/–रु २) २०० लिटरच्या १२ लोखंडी टाक्यामध्ये मोह सडवा माच एकुण २४०० लिटर प्रत्येकी १००/–रु दराने एकुण कि.२,४०,०००/–रु ३) १५ लिटरचे ७३ लोखंडी डब्यामध्ये मोह सडवा माच एकुण १०९५ लिटर प्रत्येकी १००/–रु दराने एकुण किं.१,०९,५००/–रु ४) १५ लिटरच्या २० प्लास्टिक कॅनमध्ये मोह सडवा माच एकुण ३०० लिटर प्रत्येकी १००/–रु दराने एकुण किं.३०,०००/–रु ५) १५ लिटरच्या १० प्लास्टिक कॅनमध्ये गावठी हातभट्टीचे दारु एकुण १५०लिटर प्रत्येकी २००/–रु दराने एकुण कि.३०,०००/–रु अशा प्रकारे वरील प्रमाणे गावठी हातभट्टीची दारु व मोह सडवा माचची एकुण कि.५,०९,५००/–रु माल जागेवरच नष्ट करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक श्री.अनुज तारे यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे अवैध हातभट्टी दारुवाल्यांविरुध्द प्रभावी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे दृष्टीने तसेच वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्याकरीता सन २०२४ मध्ये एकुण ०७ लोकांवर एम.पी.डी.ए.ची प्रभावी कारवाई करुन त्यांना

जिल्हा कारागृहात स्थानबदध करण्यात आले आहे. एम.पी.डी.ए. च्या एवढया मोठया प्रमाणात व प्रभावी कारवायामुळे नव्याने गुन्हेगार गुन्हे करण्यास धजावणार नाहीत गुन्हेगारीस आळा बसेल याकरीता प्रभावी कारवाया पोलीस दलाकढुन करण्यात येत आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री.अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. भारत तांडगे अपर पोलीस अधीक्षक, श्री रामकृष्ण महल्ले पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांचे पथक सपोनि रमाकांत खंडारे, पोहवा/१९१ गजानन अवगळे,पोहवा/८०८ गजानन झगरे, पोहवा/१०१८ प्रशांत राजगुरु, पोहवा/१०२४ अमोल इंगोले, पोहवा/१०२४ प्रविण शिरसाठ, पोना/११८४ गजानन गोटे, पोना/११९२ महेश वानखेडे, मपोहवा/ २५५ सुषमा तोडकर, मपोहवा/ २७१ कविता गायकवाड , चापोका/११४९ संदिप डाखोरे यांनी पार पाडले नागरीकांनी अवैध धंदयाविरोधातील माहिती/तक्रार नियंत्रण कक्ष वाशिम यांना दयावी त्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल असे आव्हाण वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.

**(जनसंपर्क अधिकारी)**
पोलीस अधीक्षक कार्यालय,
वाशिम यांचे करीता